# सौंदर्याचा तपशील-१.

( ल्यूडोव्हीची यांच्या ग्रंथावरून )

प्रथम एक सामान्य नियम लक्षांत ठेवावा की ज्यांत कोठेही निसर्गाचा कंजूषपणा दिसेल असा चेहरा कधीही सुंदर म्हणतां येणार नाही. नाक, कान, तोंड, भुंवया, पापण्या वगैरे कोणताही भाग अपुरा दिसतां नये. तसेंच ज्याचा एखादा मुख्य भाग कुरूप आहे असा चेहरा सुंदर असणें शक्य नाही. तद्वतच शरीराचे कांही भाग इतरांचे मानाने लहान किंवा मोठे असल्यास तें शरीर सुंदर नव्हे. त्याचप्रमाणे शरीराची उंची, रुंदी किंवा स्नायूंची वाढ प्रमाणापेक्षा फार कमी किंवा जास्त असल्यास तें सौंदर्य नव्हे. आता वेगवेगळ्या अवयवांचा विचार करूं.

**नाक.** फार लहान किंवा मोठें असतां नये. तथापि हें लक्षांत ठेवावें की व्यंगचित्र वाटण्यासारखें मोठें नाक असल्यासच तें कुरूप समजावें, पण सामान्यतः नाक किंचित् मोठें असल्यास चेहरा बिघडत नाही, अशी एक फ्रेंच म्हण आहे. तथापि पुरुषांचे बाबतींत जितकें मोठें नाक चालतें, तितकें स्त्रियांचे बाबतींत चालत नाही. नाकाचे इतर दोष म्हणजे तें एका बाजूला वळलेलें असणें, बुंधाशीं चपटें असणें, ( अर्थात् चिनी लोक किंवा शिद्दी याला दोष म्हणणार नाहीत ) श्वासाला अडचण होईल इतक्या लहान नाकपुड्या असणें, नाकाचा बांक उलट्या दिशेला असणें, त्याचें टोंक बोंथट किंवा फाजील अणकुचीदार असणें, किंवा नाकपुड्या मधल्या पडद्याच्या खाली पोंचणें. हा शेवटचा दोष फारच वाईट आहे.

**जबडा व हनुवटी.** खालचा किंवा वरचा जबडा फार पुढे आलेला असतां नये. विशेषतः खालचा जबडा पुढे व नाक बुंधांत बसकें असल्यास चेहरा वानरासारखा दिसतो. तथापि पुरुषांमधे खालचा जबडा किंचित् मोठा असल्यास चांगलाच दिसतो. खालचा जबडा फार लहान असल्यास तो पुरुषांना विशेष वाईट दिसतो. हनुवटी बरोबर मध्यरेषेंत असावी.

**डोकें**, शरीराचे मानाने फाजील लहान किंवा मोठें असूं नये. या बाबतींत पुरुषांत व स्त्रियांत फरक असतो. तो हा की पुरुषांच्या डोक्याचें शरीरांशीं प्रमाण स्त्रियांच्या प्रमाणापेक्षा जास्त असतें. डोकें फार लहान असल्यास मनुष्य पुष्कळ वेळां वेडसर असतो. डोक्याची हाडें प्रमाणशीर न वाढल्यामुळे डोकें कुरूप दिसतें. या हाडांना सांधे असतात, ते योग्य वेळेपूर्वी बंद झाल्यास त्यांचें प्रमाण रहात नाही.

**केस.** चेहऱ्याचा फाजील भाग केंसांनीं व्यापल्यास तो कुरूप दिसतो. कधींकधीं अशा लोकांचे डोक्यामागचे केंस मानेखालीं जाऊन पोंचतात. कधीकधी असे लोक वेडसर असतात, पण नेहमीच असतात असें नाही. तथापि ते निःसंशय कुरूप दिसतात. डोक्यावरील केसांचा भोंवरा मध्यरेषेपासून लांब असलेला वाईट दिसतो. काखेंत व जननेंद्रियाचें वर केसांची वाढ अपुरी असल्यास तें सुदृढ प्रकृतीचें चिन्ह नव्हे.

**तोंड.** फार लहान किंवा मोठें असूं नये. त्यांतल्या त्यांत लहान असल्यापेक्षा मोठें असलेलें बरें. ओठ फार जाड असूं नये ( शिद्यांत ही कुरूपता नाहीं ). ओठ फाटलेला असुं नये. दांत फार लांब किंवा लहान असूं नये. ते लहान असल्यास पुष्कळ वेळां मधे फटी रहातात. तसेंच दातांची फार गर्दीही होऊं नये. जबडा बापाकडून व दांत आईकडून, किंवा याच्या उलट झाल्याने असें होतें. ओठ नेंहमी ओले व चकचकीत दिसूं नये.

**दांत.** स्वतःचे असावे. खोटे दांत हें रोगटपणाचें लक्षण आहे हें अजून पुष्कळांस कळत नाही. दांत पुढे आलेलेही असूं नये.

**कान.** यांत अनेक वळणें असतात, तीं योग्य आहेत का नाहींत इकडे फारच थोड्यांचें लक्ष जातें. तथापि कान चपटा असूं नये. कांही लोकांचे कानाला पाळीच नसते किंवा मानेला चिकटलेली असते, तें वाईट दिसतें. दोन्ही कान सारखे असावे आणि डोक्याचे मानाने फार लहान किंवा मोठे असूं नये. ४५ पासून ९०° पर्यंत कोण असल्यास तें वाईट दिसतें इतकेंच नव्हे तर तें शरी-

राच्या हीनत्वाचें द्योतक आहे. कानांचा रंग तांबूस असावा. तो फिकट असल्यास रक्ताची कमतरता समजावी.

**डोळे.** दोन्ही सारखे असावे, व फार बाहेर आलेले असूं नये. ते किंचित् बाहेर आलेले असल्यास स्त्रियांना शोभून जातात. ते खोलही असूं नये. दोन डोळ्यांत अंतर फाजील असल्यास तें वाईट दिसतें. वाजवीपेक्षा कमी तितकें वाईट दिसत नाहीं. तिरवेपणा वाईट दिसतो हें सर्वांस समजतें. दोन्ही डोळ्यांचा रंग सारखा असावा आणि ते सारख्या उंचीवर असावे. वरची पापणी जड, उचलण्यास कठिण, असूं नये. भुंवया फार जाड आणि मधे जोडलेल्या असणें हा मोठा दोष आहे. पापणीचे केस सारखे असावे, कोठे कमी, कोठे जास्त असूं नये, डोळ्यांतील पांढरा भाग निळा असूं नये.

**हात व नखें.** बोटें पांचपांचच असावीं. बोटें जास्त असणें किंवा जुळलेलीं असणें हा आनुवंशिक दोष आहे. तळहाताचे मानाने बोटें फार आखूड असूं नये. करांगुळी कधीकधी फाजील लहान असते, कधी आंगठा फार आंखूड असतो. आंगठा लांब असणें हें मनुष्याचें वैशिष्ट्य आहे. तो नसल्यास मनुष्याच्या आणि वानराच्या हातांत फरक नाहीं, याकरता हा मोठाच दोष आहे. असा मनुष्य पुष्कळ वेळां रानटी स्वभावाचा असतो. कांहींचीं सर्वच बोटें आंखूड असतात, तेंही वाईटच. नखांवरून प्रकृतीची परीक्षा चांगली होते. त्यांना किंचित् बांक असावा, फार असूं नये आणि त्यांवर खांचखळगे, रेघा वगैरे असूं नये किंवा बांक उलट बाजूला असूं नये.

**कातडी.** फार तेलकट किंवा फार रूक्ष असूं नये. तीवर फार केस असूं नयेत. हें स्त्रियांत रोगचिन्ह समजावें. पुरुषांतही फार केस ( सर्वांगावर ) वाईटच दिसतात.

**इतर अवयव.** कोणताही अवयव प्रमाणांत नसला तर अर्थातच तो वाईट दिसतो. एखाद्या दोषाने मनुष्य उत्क्रांतीच्या शिडीची एक पायरी खाली उतरला असा भास होतो आणि असें असल्यास त्यांत इतरही दोष असण्याचा

संभव असतो. उदाहरणार्थ वानरांचे हात माणसांपेक्षा पुष्कळ लांब असतात, तेव्हा हात फार लांब असल्यास तसा भास होईल. हात व पाय दोन्ही लांब असल्यास कामविषयक कमतरता असण्याचा संभव असतो. मान फार लांब असल्यास क्षयरोग असण्याचा संभव असतो. ती फार आखूड असल्यास त्यापेक्षाही वाईट दिसते. ती कधीकधी उभें रहाण्याच्या लकबीमुळे आखूड दिसते, परंतु ती खरीच आंखूड असल्यास बहुधा फाजील जाडही असते. शरीर फाजील कृश किंवा स्थूल असूं नये. दोन्हीही दोषच आहेत. कृश माणसांना क्षयरोग होण्याचा संभव जास्त आणि स्थूल माणसांना इतर रोग जास्त प्रमाणांत होतात.

कुटुंबांत एखादेंच मनुष्य फाजील उंच असेल तर तें बीजकोशांच्या कमतरतेचें चिन्ह समजावें. अशा लोकांचे हात व पाय फाजील लांब असतात. उंची फारच कमी असेल तर तेंही वाईटच.

पाठीचा कणा वांकडा असणें, पोंक येणें, पोट फार पुढे येणें, हेंही कुरूपतेचेच प्रकार आहेत.

अमुक प्रकारची बाह्य कुरूपता असली म्हणजे त्या माणसांत अमुक प्रकृतिदोष असलाच पाहिजे असें निश्चित कोष्टक प्रत्येक बाबतींत जरी अजून ठरलेलें नाही, तरी बाह्यतः कुरूपता, म्हणजे विजोडपणा, दिसल्यास अंतरिंद्रियांतही विजोडपणा असण्याचा बराच संभव असतो आणि अशा माणसांशीं विवाह करण्यांत मुलें विकृत होण्याचा धोका असतो, असें निश्चित म्हणण्यास बिलकुल हरकत नाही; आणि वधूवरांची निवड होतांना सौंदर्याला महत्व द्यायचें तें एवढ्याकरताच. या दृष्टीने पहातां बाह्य शारीरिक दोष अलीकडे शस्त्रक्रियेच्या साहाय्याने लपवतां येतात हें बरें नव्हे असें म्हणावें लागते. उदाहरणार्थ ओठ फाटलेला असल्यास तो पूर्वींही शिवतां येत असे, पण तो तसा शिवल्याची खूण रहात असे, आणि ती सहज ओळखतां येत असे. परंतु ही खूण बिलकुल दिसूं नये इतकी बेमालूम पद्धत हल्ली निघाली आहे. यामुळे अमुक मनुष्यांत असा दोष होता हें समजत नाही आणि असा मनुष्य सुदृढ म्हणून निवडला जाण्याचा धोका असतो

आणि एखाद्या स्त्रीने अशी निवड केल्यास तिला फाटलेल्या ओठांचीं मुलें होतील. अशाच रीतीने पतित स्तनांवर शस्त्रक्रिया करून ते पूर्ववत् करतां येतात, नाक वांकडें असल्यास सरळ करतां येतें, जबडा दुरुस्त करतां येतो, इ. इ. म्हणजे अशा शस्त्रक्रियांनी बाह्य विजोडपणा नाहीसा करतां येतो आणि ज्या खुणांवरून अंतर्विषमता पूर्वी ओळखतां येत असे, त्या नाहीशा झाल्यामुळे वैवाहिक दृष्टीने निवड करणारांची फसवणूक होते. कारण हे दोष आपणांत होते असें कबूल करणारे लोक क्वचितच सांपडतील.

आता कोणी म्हणेल की याच तत्वावर कृत्रिम दांतांचा उपयोग करूं नये असेंही तुम्ही म्हणाल ! परंतु कृत्रिम दांतांनी कोणीही फार दिवस फसत नाही. ते प्रथमदर्शनीं न ओळखले तरी कालांतराने ओळखतात, तेव्हा त्यांनी फसवणूक होणार नाही. परंतु वर सांगितलेले प्रकार कितीही उपयोगी असले तरी त्यांनी भयंकर फसवणूक होते. तसेंच मधुमेह हाही आनुवंशिक रोग आहे आणि हल्लीच्या इन्सुलीनच्या शोधामुळे मधुमेहाचीं माणसें पाहिजे तितकीं जगतात आणि रोगी संतति उत्पन्न करतात. तेव्हा हा शोधही सामाजिक दृष्टया वाईटच आहे. अशीं अनेक उदाहरणें दाखवतां येतील. सौंदर्याचा आणखी विचार पुढील लेखांत करूं.

---

# प्रेमळ स्नेह

—:o:—

( ई. आर्मा यांचे फ्रेंचवरून )

मीं बऱ्याच लोकांकडे पुढील प्रश्नावली पाठवली:-१ स्वतःस पुढारलेले म्हणवणारे बहुतेक लोक किंवा संस्था स्त्रीपुरुषसंबंधाचे सुधारणेचे बाबतींत सोंवळेपणा, बेपरवाई किंवा विरोध कां दाखवतात ? या बाबतींत चालू समाजनीतीपेक्षा कांहीं वेगळ्या प्रकारचे प्रयोग करायला ते कां तयार नसतात ? २. त्याचप्रमाणे

असूयेमुळे होणाऱ्या अत्याचारांसंबंधी ते मौन कां धरतात? हा तरी निदान केवळ माणुसकीचा प्रश्न आहे. ३. आमची प्रेमयुक्त स्नेहाची कल्पना अमलांत आल्यास असूया, मालकीहक्क, एकेरी प्रेम, पातिव्रत्य, वगैरेसंबंधी वेडगळ समजुती निदान पुढारलेल्या लोकांच्या मनांतून काढून टाकण्यास मदत होईल की नाही? या प्रश्नावलीला आलेल्या उत्तरांपैकी कांही पुढे देतों:—

ज्ञान व कल्पनाशक्ति यांत स्त्रिया पुरुषांना हार जाणार नाहीत, हें प्रत्यक्ष सिद्ध करणारी प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीलेखिका ' रने बुनां ' यांचें उत्तर:—१. याचें अंतस्थ कारण म्हणजे पुढारलेले म्हणवणाऱ्या लोकांच्या मनावरील धर्माचें दडपण. स्वतःला नास्तिक म्हणवणाऱ्या लोकांच्या मनावर देखील हें दडपण असतें. पावलो-पावलीं स्वातंत्र्याच्या आड येणारा धर्म लहानपणापासून अंगांत इतका मुरलेला असतो की तो एकदम फेंकून देणें हें केवळ म्हटल्याने होत नसतें. फ्रेंच लेखकांना जें काय थोडेंबहुत स्वातंत्र्य मिळालें आहे तें रॅबले पासून व्हॉल्तेर पर्यंत 'अश्लील' लेखकांच्या परंपरेने मिळवून दिलें आहे, हें विसरून अजून लेऑं दो दे सारख्या लेखकाला अश्लील ठरवण्याचा प्रयत्न होतोच. अश्लीलतेची हांकाटी करणारे आणि कामविषयक गोष्टींना ग्राम्य समजणारे लोक पुढारलेले कसे? त्यांचा बुद्धिवाद बोलण्यापुरताच असतो. २. या अत्याचारांच्या मुळाशीं काय आहे, हें अशा लोकांना कळतच नाही. स्वतःला क्रांतिकारक म्हणवणारे लोक देखील या मालकीहक्काच्या कल्पनेंतून सुटलेले नाहीत. व्यभिचार हा मालकीहक्काविरुद्ध गुन्हा असल्यामुळे, चोराच्या अंगावर गोळी झाडणें हा जसा गुन्हा होत नाही, त्याचप्रमाणे पतीला किंवा पत्नीला चोरूं पहा-णारांनाही ठार मारण्यास हरकत नाही असें हे लोक समजतात. अविवाहित जोडप्यांचे बाबतींत देखील अशा संबंधाचें विवाहाशीं जितकें सादृश्य असेल त्या मानाने तो गुन्हा होतो किंवा होत नाही. पुढारलेले लोक हें मालकीहक्काचें तत्व मानतात असें नाही, पण आजच त्यावर हल्ला करण्यांत शहाणपणा नाही असें ते समजतात, कारण उगाच समाजाच्या विरुद्ध कां जा? ३. प्रेमयुक्त स्नेहाविषयीं म्हणाल तर तें अंमलांत येण्याला शिक्षणाची जरूर आहे आणि

सध्यातरी सुशिक्षित मध्यमवर्गांतूनच असे लोक मिळूं शकतील, कारण फ्रान्समधील मध्यमवर्गांत मालकीहक्क न गाजवणारे पुष्कळे लोक आहेत. तुम्ही हल्ली हें शिक्षण देण्याचें काम करीत आहां आणि त्यांत तुम्हांस यश येवो अशीच माझी इच्छा आहे.

प्रसिद्ध लेखक 'आं रिनेर' यांचें उत्तरः—१. बऱ्याच लोकांचे बाबतींत याचें कारण आळस असावें. कित्येकांना असेंहि वाटत असेल की तुमच्या इतकें चांगलें आपल्याला लिहितां येणार नाही, तेव्हा हें काम तुमच्यावरच सोंपवावें. कांही लोकांना पोटापलीकडे कांही सुचतच नाही. ते म्हणतात पोटाचा प्रश्न तेवढा महत्वाचा आहे. क्रांतीने लोकांचे हातांत सत्ता आली म्हणजे बाकीचे विचार करतां येतील. कांहींना हा विषय हलक्या प्रतीचा वाटतो, यामुळे ते दुर्लक्ष करतात. कांहींना तो इतक्या महत्वाचा वाटतो की त्यावर मोठे ग्रंथच लिहिले पाहिजेत, लहान लेख लिहितां नये असें ते म्हणतात. २. पुढारलेल्या लोकांत मालकीहक्काची कल्पना शिल्लक असली तरी तीमुळे अत्याचार होण्याचा संभव कमी असल्यामुळे त्यांना अत्याचारांचें महत्व वाटत नाही, कारण दूरवर विचार करण्याची मनुष्याची प्रवृत्ति नसते. ३. आपण म्हणतां तसा सहकारी संघ काढण्याची कल्पना वाईट नाही, पण त्यांत असलेली थोडीशी सक्ती देखील जाचक होण्याचा संभव आहे, आणि कदाचित् असेंहि होईल की त्यांतील घटकाने संघाबाहेर कोणावर प्रेम करतां नये अशीही वृत्ति कदाचित् उत्पन्न होईल. तथापि प्रयोग करणें गैर नाही आणि त्यांतून कदाचित् कांही अनपेक्षित गोष्टी समजतील.

प्रसिद्ध लेखक 'जेरार् द लॅकॅझ्-द्यूतिए' यांचें उत्तरः—१. पुढारलेले लोक या बाबतींत पुढारलेले नसतात, किंवा मागसलेलेही असतात. यावरून ते बुद्धिवादी नसतात असें सिद्ध होतें. केवळ युद्धाला व फाजील देशभक्तीला विरोध केला म्हणजे स्वतंत्र विचारांचा मनुष्य होत नाही. जोंपर्यंत कामविषयक बाबतींत तो स्वतंत्र विचार करूं शकत नाही, तोंपर्यंत तो गुलामच आहे. या बाबतींत

पूर्वग्रह, वेडगळ समजुती आणि रूढि यांचें इतकें साम्राज्य आहे की या विषया-वर मनुष्याचीं मतें काय आहेत, यावरूनच मनुष्य कितपत पुढारलेला आहे हें ठरवणें योग्य होईल. या बाबतींत विचारस्वातंत्र्य दाखवण्यालाच खरें धैर्य लागतें, कारण यांत सरळ विचार करणारावर लोकांची वक्रदृष्टि होते. यांत लोक रूढीनें इतके बांधलेले असतात की वाद करायला देखील ते तयार नसतात. यांत बहुतेक लोक सोंवळे किंवा बेपरवा असतात. या विषयावर होतां होईल तों बोलायचें नाही, कारण त्यांत उत्पन्न होणाऱ्या महत्वाच्या प्रश्नांचा विचार करायची तयारी नसते. असें कां? 'इंटरनॅशनल' चीं गीतें म्हटलीं आणि क्रांतिकारक सभांतून लालभडक ठराव पास केले की आपली इतिकर्तव्यता संपली असें पुढारलेले क्रांतिकारक समजतात. कामविषयक प्रश्नांचा विचारच करायचा नाही, स्वतः मात्र वाटेल तें करायचें, अशी त्यांची पद्धत असते. हल्लीचे पुढारलेले लोक अश्लीलतेचा बाऊ करतात. बायबलांतली अश्लीलता त्यांना दिसत नाही. सॉव्हिएट् क्रांतीची पूजा करणारा एक मनुष्य मला माहीत आहे, पण या बाबतींत मात्र तो अत्यंत पारंपरिक आहे आणि कोणी बुद्धिवाद करूं गेल्यास तो संतापतो. बायकोने व्यभिचार करूं नये म्हणून तो तिला कुलपांत ठेवतो, मुलीने एखाद्या पुरुषाकडे पाहिलें किंवा तिला चुकून एखादे वेळीं एकटी बाहेर पडण्याची परवानगी मिळालीच आणि तिला घरीं परत यायला पांच मिनिटें उशीर झाला तर तिला मारतो. सर्वच समाजसत्तावादी असे असतात की काय हें माहीत नाही, पण बरेच असतात यांत शंका नाही. 'लिबेर्तेर्' नांवाचें स्वतंत्र म्हणवणारें पत्र देखील इतरांना स्वातंत्र्य द्यायला तयार नाही. पॅरिसमधील भूमिगत आगगाडींत गर्दी होते आणि तेथे स्त्रिया व पुरुष दोघे असल्यामुळे कधीकधी भलत्या ठिकाणीं अनिच्छित स्पर्शाचे प्रसंग येतात. अशा वेळीं एक तरुण म्हातारा आणि एक दुकानांत काम करणारी मुलगी समोरासमोर उभीं होतीं व गर्दी खूब झाली होती. एवढ्यावरून अश्लील शंका घेऊन संपादक महाशयांनी चवताळून एक लेख खरडला होता. समजा तो म्हातारा मुद्दामच तेथे उभा राहिला असला, तरी त्या मुलीची ज्याअर्थी तक्रार नव्हती त्याअर्थी इतरांनी चिडण्याचें काय कारण? पण कामविषयक बाबतींत या लोकांना सरळ विचारच

करतां येत नाही, तेव्हा या पुढारलेल्या लोकांत आणि सामान्य मध्यम वर्गांत या बाबतींत बिलकूल फरक नसतो. २. याच कारणामुळे त्यांनी चालवलेल्या पत्रांत असूयेच्या अत्याचारांचा विचार केलेला नसतो. शिवाय हीं पत्रें चाललीं पाहिजेत, तेव्हां वाचकांच्या मतापेक्षा फारसें वेगळें लिहितां येत नाही. खरोखर पुढारलेले जे संपादक असतील, ते याकरता नियमाने जागा राखून ठेवतील. व्यभिचारामुळे असूयामूलक खून किंवा आत्महत्या वगैरेमधे मालकीहक्काचें तत्त्व मुख्य कारण असतें. अशा वेळीं खून करणाराला नेहमी माफी मिळते, कारण मालकीहक्क समाजाच्या हाडीमासीं खिळलेला आहे आणि क्रांतिवादीही त्याला अपवाद नाहीत. स्वतःच्या शरीरावर या बाबतींत आपली मालकी नसते, दुसऱ्याची असते, तेव्हा त्याला खून करण्याचा हक्कच पोंचतो असें कोर्टें समजतात. ३. या प्रश्नाचें महत्त्व पाहिलें म्हणजे तुमचे रूढीविरुद्ध प्रयत्न स्तुत्य आहेत. तुमचा मार्ग नवीन असल्यामुळे तुम्हाला प्रयोग करण्याचा हक्क पोंचतो. असूया नाहीशी करण्याचा हा उपाय आहे. हा केवळ संवयीचा प्रश्न आहे, असूया ही एक रूढि आहे आणि तुम्ही पुरस्कार करतां तसा संघ खरोखर अस्तित्वांत आल्यास असूयेविरुद्ध बरेंच काम होणार आहे.

'आ. लाफार्ज' ( हे अमेरिकेंत फ्रेंचचे प्रोफेसर आहेत ) यांचें उत्तरः—मी सांगणार आहे तें स्वतःचें मत म्हणून नव्हे, तर सामान्यतः पुढारलेल्या पत्रांच्या वाचकांचें मत असें असतें की कामविषयक गोष्टींची स्पष्ट शब्दांत चर्चा केल्याने त्यांतील काव्य नाहीसें होऊन त्याला केवळ शारीरिक प्रवृत्तीचें ग्राम्य स्वरूप येतें. आणि पुष्कळ समंजस लोकांना जरी हा विषय अश्लील वाटत नाही तरी त्यांना त्यांतील काव्य पाहिजे असतें आणि म्हणून ते ही खाजगी बाबत समजून तिची वाच्यता करायला तयार नसतात. तेव्हा अशा विषयावर लिहिण्यांत आपलें धैर्य कबूल करूनहि आणि सत्यान्वेषणाची कितीही जरूरी असली तरी हे विषय नियतकालिकांपेक्षा पुस्तकांतच असावे आणि त्यांची मीमांसा अधिक नाजूक आणि कलायुक्त असावी असें पुष्कळ पुढारलेल्या लोकांनाही वाटतें. यावर जितका खोल विचार करणें जरूर आहे तितका करण्यास वेळ नसल्यामुळे मीं हा प्रश्न आमचें

घर सांभाळणाऱ्या बाईला विचारला आणि तिचें उत्तर ऐकून थक्क झालों. ती म्हणाली, ' ही खाजगी बाब आहे, यांत दुसऱ्या कोणाचा संबंध नाही. मला वाटेल तें मी करतें, आणि माझा नवराही तसेंच करतो. सर्वांनी असेंच वागल्यास कोणाचेंच नुकसान नाही. ' तसेंच एकदा मला एक पाद्री भेटला. तो स्वतः अज्ञेयवादी होता. तो म्हणाला 'माझ्यासारखे पुष्कळ आहेत, पण हा धंदा पतकरला आणि तो सोडायची तयारी नसली म्हणजे खरें बोलतां येत नाही. आम्हीही माणसेंच आहोंत तेव्हा इतर माणसांसारखेच आम्ही वागतों. इतर माणसें व्यभिचार करतात तसा आम्हीही कधीकधी करतों.' आज सकाळीं एक कॅम्युनिस्ट तरुणी मजकडे आली. ती म्हणाली, ' मी स्वातंत्र्याची भोक्ती आहें, माझें एखाद्यावर प्रेम बसलें की मी सर्वस्व त्याला अर्पण करतें पण तो जर मालकीहक्क सांगून दुसऱ्यावर माझें प्रेम बसतां नये असें म्हणूं लागला की मी त्याला सोडून जाईन. ' दुसऱ्या एका कॉम्युनिस्ट म्हणवणाऱ्या बाईला मी तुमचे विचार सांगितले. तेव्हा ती म्हणाली ' तो मोठा शहाणा आहे. माझा प्रियकर दुसरीकडे गेला तर मी बरी गप बसेन ! ' यावरून कॉम्युनिस्ट लोक, आणि विशेषतः बायका, इतरांप्रमाणेच असतात. जोंपर्यंत स्वतःचा संबंध आला नाही तोंपर्यंत पुष्कळ लोक तुमच्यासारखेच बोलतात, पण स्वतःवर बेतली म्हणजे मात्र बदलतात. बहुतेक लोक या बाबतींत स्वार्थी असतात आणि समाजहिताच्या दृष्टीने काय चांगलें हें पहाण्याची त्यांची दृष्टीच नसते.

लिंगशिक्षणावर ग्रंथ लिहिलेले प्रसिद्ध लेखक ' जां मार्स्तां ' यांचें उत्तरः—
१. कॉम्युनिस्ट असें समजतात की हल्लींची विवाहपद्धति आर्थिक स्थितीशीं बद्ध आहे आणि आर्थिक क्रांति होऊन सर्वांना आपोआपच अन्नवस्त्र मिळूं लागल्यावर कामविषयक स्वातंत्र्य आपोआपच मिळेल. २. असूयामूलक अत्याचारांविरुद्ध लेख मी पुढारलेल्या पत्रांत पाहिले आहेत. ते याहीपेक्षा जास्त प्रमाणांत आल्यास कांही बिघडणार नाही. हे अत्याचार बहुधा अविचारी संतापामुळे होतात, परंतु अशा गोष्टींना शिक्षणाने आळा बसण्याऐवजी उलट नीति, अब्रू , मालकीहक्क वगैरे भलत्याच कल्पनांमुळे अशा प्रवृत्तींना उत्तेजन मिळतें. ३. प्रेमयुक्त स्नेहा-

विषयीं म्हणाल तर तो पुष्कळ लोकांत असतो. मात्र हा प्रकार उघडपणें होत नाही. तुमच्या मतें अशा लोकांचा संघ काढावा आणि सदस्यांनीं एकमेकांची गरज भागवणें हें कर्तव्य समजावें. यांतील हेतु चांगला आहे आणि तात्विक दृष्ट्या त्यांत कांहीं वाईट नाही, पण तें व्यवहार्य नाही. समागमांत दोन माणसांचा इतका निकट संबंध येतो की चारचौघांत एकत्र बसून खाणें किंवा एखाद्याला आपल्या घरीं रहायला जागा देणें, अशा गोष्टींशीं त्याची तुलना होत नाही. जेव्हा दोन माणसांची समागमाची इच्छा असेल तेव्हा ठीकच आहे, परंतु जेव्हा तशी इच्छा नसेल तेव्हा–विशेषतः स्त्रियांनां–समागम दुःसह होईल. वेश्यांना ( तो धंद्याचा प्रश्न असतांही ) पुष्कळ लोकांचा किळस येतो, पण तो त्यांना दाखवतां येत नाही. मग जेथे धंद्याचा प्रश्न नसेल तेथे त्यांनी हें कसें सहन करावें ? इतकेंच काय परंतु पुरुष इतके चोखंदळ नसतात, तरी त्यांनाही अशा प्रकारचा करार मान्य होणार नाही. असें असावें असें माझें म्हणणें नाही, पण माझ्या अवलोकनांत मला जें दिसलें तें सांगतों. ' ॲटलांटिस् ' संघाची मीं अशी हकीकत वाचली आहे की त्यांतील स्त्रीपुरुष एका वनांत जाऊन विवस्त्र होऊन भोजनानंतर कामक्रीडेची योजना करून कोणाचीही निराशा होऊं नये म्हणून जोडपीं ठरवण्याकरता त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या होत्या. पण मला असे पुरुष माहीत आहेत की ते नीतिबाज किंवा दुष्ट नसूनही, अशा चिठ्ठ्या टाकल्यावर आपल्या गळ्यांत एखादी भिशाळ आणि घाणेरडी बाई पडेल या भीतीने ते जागच्याजागींच गारठतील. शिवाय अशीही कल्पना करूं की संघांत फक्त तरुण, सुंदर आणि स्वच्छ असेच लोक घेतले, तरी कदाचित् कांही दिवस वैचित्र्याचा अनुभव पुष्कळांना आवडेल, परंतु नंतर त्यांत आपोआप प्रेम उत्पन्न होऊन जोडपीं बनतील आणि मग तीं संघाच्या नियमांना जुमानणार नाहीत. यापेक्षा मला व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्वच जास्त पसंत आहे. तें असें कीं दोघांची संमति असल्यावर समागमास कोणतीही अडचण असूं नये.

आणखी कांही उत्तरें पुढे देऊं, पण वरील उत्तराला प्रत्युत्तर म्हणून वर उल्लेखिलेल्या अटलांटिस् संघांतील ( हा संघ फ्रान्सचे बाहेर आहे ) एका स्त्रीनें

पुढील पत्र लिहिलें आहेः – ( जानेवारी १९२८ ). ' वरील लेखकमहाशयांना तरुण आणि सुंदर स्त्रिया पाहिजेत आणि चिठ्ठया टाकल्यावर एखादी मिशाळ आणि घाणेरडी स्त्री आपल्या गळयांत पडेल अशी त्यांना भीति वाटते. त्यांच्याकरता कोणीं सुंदर आणि तरुण स्त्रिया तयार ठेवल्या नाहीत. आम्ही आपलीं खेडवळ माणसें, आम्हाला सुंदर शरीरापेक्षा प्रेमळपणाची किंमत जास्त वाटते. आणि तारुण्य नसलें तर अनुभव असतो, आणि त्याची किंमत या बाबतींत फार असते. आम्ही आपले सरळ साधे लोक आहोंत, आम्हाला उच्च तत्वज्ञान येत नाही. एकमेकांना सुख कसें द्यावें एवढेंच आम्हाला कळतें. तरुणांची कामेच्छा व भूकही अधिक तीव्र असेल, वृद्धांत दोन्हींही कमी प्रमाणांत असतील, परंतु दोघांचाही समाधानाचा हक्क सारखाच आहे. ज्यांनी आमचा संघ स्थापून मतप्रचारास मदत केली त्यांना म्हातारपणीं आम्हीं दूर सारावें हें आम्हाला बरें दिसत नाही. ' या खाली सही ' एक पांढऱ्या केसांची सदस्य ' अशी आहे. ( अपूर्ण ).

---

# मालकीची वस्तु

—— :०: ——

लेखक, माधव खंडेराव बागल, कोल्हापूर.

खुशालराव आपल्या स्नेह्याला म्हणाला, ' वडिलांची इच्छा मुलाने शिक्षण झाल्यावर आपलें लग्न करावें अशी असते हें ठीक आहे, पण त्यांच्या इच्छेप्रमाणे मुलगा तयार होईपर्यंत त्याचें निंमे आयुष्य जाण्याची वेळ येते, याचा त्यांना विचारच येत नाही. यांनी आयुष्यांतलीं सुखें भोगायचीं आणि पोरांनी म्हणे ध्येयावर लक्ष ठेवून ब्रह्मचर्यव्रत पाळावें ! हें परोपदेशे पांडित्य ठीक ! शामराव, तूं आमच्या वडिलांना स्पष्ट कळवून टाक की खुशालराव यंदा आपलें लग्न करून टाकावें म्हणतो म्हणून. आमची परीक्षा कांही पास व्हायची नाही आणि लग्नाचा योग कांही यायचा नाही. '

# मालकीची वस्तु

शामरावाने खुशालरावांच्या वडिलांची गांठ घेतली. त्यांना खुशालरावाची इच्छा कळवली आणि म्हणाला ' बाबासाहेब, करून टाकाच त्याचें लग्न यंदा. नाहीतर स्वारी भलत्याच नादीं लागायची ! '

वडिलांनी लगेच एक स्थळ पाहिलें आणि मुलगी पसंत करण्याकरता मुलालाच धाडून दिलें. मुलगी नाकाडोळ्यांनी ठीक होती, रंगाने गोरी होती आणि वयांत आलेली होती, खुशालरावांना इतके गुण पुरे होते. त्यांनी होकार दिला.

बापाने पहिल्याच मुहूर्तावर लग्नसमारंभ पार पाडला. मुलगी पसंतीने ठरवली म्हणून याला कांही प्रेमविवाह म्हणतां येणार नाही. कारण सहजासहजी भेटी होऊन त्यांचें चित्त एकमेकांकडे ओढलें गेलें असें मुळीच नव्हतें, मुख्य गोष्ट म्हणजे त्यांना बायको पाहिजे होती, हक्काची आणि हुकमाची एक स्त्री पाहिजे होती. लग्नाबाहेरच्या संबंधाला समाजाने भरपूर निर्बंध घातल्यामुळे व खुशालरावही तसे विशेष धाडसी नसल्यामुळे त्यानी आपला हा साधासुधा रूढीने रूळलेला मार्ग पतकरला.

लक्ष्मी स्वभावाने गरीब, आज्ञाधारक, सुशील, वगैरे पुरुषजातीने अपेक्षिलेले सर्व गुण तिच्या अंगीं होते. यामुळे उपभोग्य वस्तु म्हणून जरी तिची प्रथम निवड झाली असली, तरी गुणांमुळे ती त्यांची आवडती झाली. अतिपरिचयात् अवज्ञाही होते आणि अतिपरिचयाने आपलेपणाही उत्पन्न होतो, व या गोष्टी एकाच वेळींही असूं शकतात. जिव्हाळा व कंटाळाही असूं शकतो. त्यांचीं पहिलीं कांही वर्षें सुखांत गेलीं. त्या दरम्यान् त्यांना दोन मुली व एक मुलगा इतकीं अपत्यें झालीं. पण पुढेपुढे खुशालरावांना घरचा कंटाळा येऊं लागला. तोच नित्यक्रम, रोज तेंच रडगाणें, वाढत्या मुलांमुळे पोटाची विवंचना, या गोष्टीमुळे त्यांना यांतून सुटण्याची इच्छा होऊं लागली.

एक अचानक प्रसंग घडून आला. खुशालराव संध्याकाळीं सायकलीवरून घरीं येत होते. रानांत गेलेलीं जनावरेंही याच सुमारास घरीं येत होतीं त्यांनी

समोरचा रस्ता अडवून टाकल्यामुळे खुशालरावांना सायकलवरून उतरावें लागलें. याच वेळीं त्याच रस्त्याने एक तरुण स्त्री जात होती. जनावरांनी वाट अडवल्यामुळे तीही रेंगाळत चालली होती. इतक्यांत समोरून एक मोटार आली, तिच्या कर्ण्याने एक गाय बुजली आणि त्या तरुण स्त्रीच्या बाजूला धांवत आली. तिच्या अंगावर जाईल म्हणून खुशालराव मधे आले, त्यांना तिचें शिंग लागून कोट फाटला आणि दंडांतून रक्त वाहूं लागलें.

आपल्याकरता एका अनोळखी इसमाने पुढे होऊन गाईला अंगावर घेतली आणि त्यामुळे त्याला जखम झाली हे पाहून स्त्रीजातीची संकोचवृत्ति टाकून ती त्यांना एकदम म्हणाली, ' किती लागलें आपल्याला हें ! आपण करायला गेलां उपकार आणि झालें भलतेंच. '

—' नाही, तसें कांही विशेष लागलें नाही. '

—' असें कसें होईल ? चांगलें रक्त वाहूं लागलें आहे न्. आपण चलाच आमच्या घरीं. घर अगदी जवळ आहे. हाताला पट्टी तरी बांधतां येईल. चलाच आपण. '

रेखीव नाक, बांधेसूद अंगयष्टि आणि हृदयाला वेधणारी दृष्टि. अशा स्त्रीचा मिळणारा सहवास आणि तोही चालून आलेला. त्याला खुशालराव कसे टाकतील ?

लीलेच्या घरांत आईशिवाय दुसरें कोणी नव्हतें. यामुळे तिच्या बोलण्याचालण्यांत आणि वागण्यांत सासुरवासणीची औपचारिक मर्यादा नव्हती. त्याचा कोट काढायलाही तिने मदत केली आणि जखम धुवून लगेच त्यावर पट्टी बांधली. एका परक्या सुस्वरूप युवतीचा तो स्पर्श ! त्या स्पर्शाबरोबर कितीतरी कल्पना व वासना त्याच्या मनांत उभ्या राहिल्या. कधीही न अनुभवलेल्या सुखाचा लाभ त्या एका क्षणांत त्याला मिळाला. खुशालराव लीलेच्या हातचा चहा वगैरे घेऊन निवांतपणें बाहेर पडले. बाहेर पडतांना लीला त्यांना सहजी बोलली, ' केव्हातरी येत जा. ओळख झालीच आहे. ' बोलतांना लीलेच्या चेह-

त्यावर त्यांनी केलेल्या उपकाराची जाणीव दिसत होती. खुशालरावांना या विनंतीची सुद्धा जरूरी नव्हती. त्यांनी लगेच कबूल केलें.

खुशालरावांचें लीलेच्या घरीं जाणेंयेणें सुरू झालें. लीलेने त्यांना पुष्कळ वेळां आग्रहाने बोलावून मेजवान्या दिल्या. ती त्यांच्याबरोबर मोकळ्या मनाने वागे. हे तेथे तासतासभर गप्पा मारण्यांत वेळ घालवींत. तरुणतरुणींच्या गप्पा त्या. निसर्गाला धरून त्यांचें रूपांतर व्हावयाचें तसें झालें. ती एकमेकांवर प्रेम करूं लागलीं.

लीला विधवा नव्हती. कारण तिच्या कपाळाला कुंकूं होतें. पण मालकीचें बंधन तुटून गेल्यामुळे तिची वागणूक बरीच स्वतंत्रपणाची होती. खुशालराव नेहमी येत जात, पण त्यांच्याकडून तिने पैशाची कधीच अपेक्षा केली नाही. त्यांनी देऊं केलेली रक्कमही तिने स्वीकारली नाही. या तिच्या निःस्वार्थी वागणुकीमुळे तर खुशालराव तिच्यावर फारच प्रेम करूं लागले. तिच्याबद्दल त्यांना आदर वाटूं लागला. पण आपलें पूर्वींचें चरित्र तिने अद्याप त्यांना कळूं न दिल्यामुळे त्यांचें मन अस्वस्थ होई. प्रतिस्पर्ध्याच्या कल्पनेने त्यांचें डोकें भडकून जाई. विषयासक्त प्रेम मत्सरी असतेंच असतें. मत्सर आणि प्रेम यांचा संबंध फार जवळचा असतो.

एकदा तसेंच कारण घडून आलें. लीलेच्या घरीं पुरुष कोणीच येत नसत. येणारेजाणारे म्हणजे एकटे खुशालरावच. यामुळे लीला केवळ आपलीच आहे, आपण तिचे पूर्ण मालक आहोंत, अशी त्यांची भावना होती. त्यामुळे त्यांच्यांत मत्सराने ठाणें केलें होतें. नेहमीप्रमाणे हे घरांत शिरत असतां म्हातारी एकदा एकदम पुढे होऊन म्हणाली, 'आमच्या ओळखीपैकी एक गृहस्थ आले आहेत. उगाच शंकेला जागा नको. आपण उद्याच या.' अशी खुशालरावांची समजूत घालून म्हातारीने त्यांना बाहेर घालविलें.

खुशालरावांना शंका होतीच. त्यांना एवढें कारण पुरे झालें. ते दुसरे दिवशीं आलेच नाहींत. लीलेने निरोप पाठवला तेव्हा ते आले पण ते जरा फुग-

लेलेच होते. तो आलेला गृहस्थ कोण याचो शहानिशा करण्याचा त्यांनी निश्चय केला होता. या त्यांच्या आग्रहामुळे लीलेची स्थिति अगदी केविलवाणी झाली. ती काकुळतीला येऊन म्हणाली, ' तुमची ओळख होण्यापूर्वी माझे अनेक संबंध जुळलेले आहेत, ते सर्व मला तोडतां कसे येतील ? माझ्यावर ज्यांचे उपकार झाले आहेत त्यांना टाकून कसें देतां येईल ? पण माझ्यावर तुमचा विश्वास असेल तर खात्री असु द्या की प्रेम असें माझें कोणावर असेल तर तें तुमच्यावरच. तेवढ्या वेळेपुरतें त्यांचें समाधान झालें, पण तें टिकलें नाही. पुनः तसाच प्रसंग आला.

रतनशेटच्या कानावरही लीलेकडे कोणी गृहस्थ येतो ही कुणकुण गेली होती. तिचा दुर्गुण म्हणजे ती सुंदर होती. सुंदर बायको म्हणजे जणूं नवऱ्याची शत्रु. उगाच नाही त्या शंका घेऊन लग्नाच्या नवऱ्याने एका वस्त्रानिशीं तिला बाहेर काढली होती. त्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन रतनशेटने तिला पोसली आणि पोटाची गुलामगिरी पतकरल्यावर देहाची गुलामगिरीही तिला मुकाट्याने मान्य करावी लागली. खुशालरावावर तिचें प्रेम बसलें, पण त्याच्या प्रेमालाही मालकीची हांव सुटली. त्यामुळे त्याही प्रेमांत वितुष्ट येऊं लागलें. प्रेम आणि विषय या गोष्टी त्यांना विभक्त करतां येईनात. आपल्याप्रमाणे ती दुसऱ्याच्याही मालकीची असावी ही कल्पना त्यांना असह्य झाली.

रतनशेटची पण तीच स्थिति झाली. आपण इतके पैसे खर्च केले. अर्थात् लीला आपल्या मालकीची. आपल्या हक्काच्या वस्तूचा अपहार दुसरा कोणी करतो आहे हें समजल्यावर तेही तिच्यावर पाळत राखूं लागले. पूर्वी बहुधा तीच त्यांच्या घरीं जाई, पण आता तेच स्वतः तिच्याकडे कांही तरी निमित्ताने येऊं लागले. तिची स्थिति अवघड होऊं लागली.

एकदा रतनशेट आले त्याच वेळीं खुशालराव दारांत. रतनशेटला जा म्हणण्याचें तिच्या मनांत असलें तरी बोलण्याची ताकद नव्हती. ती त्यांच्या उपकारांत होती, त्यांची आश्रित होती. खुशालराव त्रागा करून चरफडत निघून

गेले. हा आपल्याशीं प्रतारणा करीत आहे, तिचें प्रेम दुसऱ्यावर आहे असें समजून त्यांनी येणेंजाणें टाकून दिलें. बोलावणें आलें तरी गेले नाहीत.

खुशालरावांना स्वतःची बायको होतीच, जनरीतीप्रमाणे ते तिच्याबरोबर वागायचे तसे वागत होतेच. त्यांना मुलेंही झालीं होतीं, आणि अशा स्थितींतही लीलेवर त्यांचें प्रेम जडलें होतें, पण लीलेला पूर्वसंबंध कायम ठेवून आपल्यावर प्रेम करतां येईल ही कल्पना त्यांना शक्य कोटींतील वाटेना. निर्जीव वस्तूंप्रमाणे स्त्रीही आपल्या पूर्ण मालकाची असावी असें पुरुषांना वाटत असतें, त्या मालकींत भागी आली म्हणून खुशालरावांनी लीलेला टाकून दिली, येणेंजाणें कमी झालें, सहवास कमी झाला, आपलेपणा कमी होत गेला, पण तिच्या प्रेमाच्या गोंड आठवणी त्यांच्या मनांतून लवकर गेल्या नाहीत. स्वस्त्रीच्या सहवासांत सुद्धा त्यांना लीलेच्या प्रेमाची आठवण होई. तिला टाकण्यांत चूक झाली असें त्यांना केव्हाकेव्हा वाटे पण खोट्या आढ्यतेमुळे ते तिकडे गेले नाहीत.

दिवस जात चालले तशा आठवणी बुजत चालल्या. खुशालरावांचे वडील वारले होते. घरच्या प्रपंचाचा सर्व बोजा त्यांच्यावर पडला होता. चार मुलें होतीं, तीन मुली आणि एक मुलगा. मिळकत कमी आणि खर्च वाढला होता. या महिन्याची त्या महिन्यास गांठ पडणें मुष्किलीचें झालें होतें. त्यांतच गांवांत इन्फ्लुएन्झाची सांथ आली. एक पोर आजारांतून उठतें आहे तों दुसरें पडे. काळजी, डाक्तराचें बिल आणि वाढतें कर्ज, यामुळे ते अगदीं डबघाईस आले.

तापाच्या साथींत लीलाही सांपडली. ती फारच आजारी होती. डाक्तरांनींही आशा सोडली होती. चारपांचखाली ताप उतरेना. शुश्रूषेला आई बारा तास होतीच. तिलाही आपण जगूं असें वाटेना. तेव्हा एकदा अखेरची गांठ घ्यावी म्हणून तिने खुशालरावांना बोलवायला धाडलें. त्यांनाही जावेंसें वाटत होतेंच, निरोप पोंचतांच ते तडक निघून आले. येतांच तिने सर्व मुलांचीं नांवें घेऊन चौकशी केली. जाणेंयेणें नसतां तिला आपल्या घरची इतकी माहिती पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. संबंध तुटलेले असतांना

सुद्धा आपली चौकशी काढलेली पाहून त्यांना तिच्याबद्दल आदर वाटला आणि आपल्या कृतीचा पस्तावा झाला.

खुशालराव खोलींत एकटेच होते. तिने मुद्दामच सर्वांना बाहेर घालवलें होतें. तिने खुशालरावांना प्रेमभराने जवळ घेतलें, आपल्या मागे आपल्या आईचा संभाळ करा म्हणून विनंति केली आणि हातांत एक लखोटा दिला. आणि ती निघून गेली !

तो लखोटा म्हणजे तिचें मृत्युपत्र होतें. तिने आपली सर्व इस्टेट खुशालरावांच्या मुलाच्या नांवाने करून दिली होती.

---

# वस्त्रासंबंधी चुकीच्या कल्पना

( डॉ. पॅतो यांच्या फ्रेंचवरून )

शारीरिक व्यायाम करतांना शरीराला हवा व उजेड मिळावा एवढाच नग्नतेच्या प्रचारकांचा उद्देश असतो. सर्वत्र आणि सर्वकाल नग्न रहावें असें कोणीहि समंजस मनुष्य म्हणत नाही. सर्वकाल नग्न रहाणारे कांही धार्मिक लोक असतात, परंतु ते धार्मिक असल्यामुळे समंजस नसतात. परंतु चेष्टा करण्याच्या सोयीचें पडावें म्हणून नग्नतेचे विरोधक भलतेंच मत प्रचारकांवर पोरकटपणाने लादीत असतात. आमचें म्हणणें असें की सुधारलेल्या म्हणजे वस्त्रें वापरणाऱ्या लोकांची त्वचा हवेच्या व उजेडाच्या अभावाने बिघडलेली आहे, तिला पुन्हा कार्यक्षम करण्याकरता हवा व उजेड जरूर तितकीं देण्याचा हक्क कोणासही असावा. ब्रुसेल्स येथील प्रो. ले यांनी म्हटलें आहे की डाक्तरासमोर किंवा स्नानाच्या आणि व्यायाम करतांना नग्न होण्यास कोणालाही लाज वाटण्याचें कारण नाही. समुद्रस्नानाचे वेळचा युरोपांतील पोषाख नग्नतेपासून फारसा भिन्न नाही, परंतु त्यांत कांही विशिष्ट भाग झांकल्यामुळे अशा भागांकडे लोकांचें विशेष लक्ष जा

इतकेंच नव्हे तर त्या भागांना हवा व उजेड न मिळाल्यामुळे नुकसान होतें. हल्लीचा मानेपासून गुडघ्यापर्यंत पोंचणारा पोहण्याचा पोषाख ज्यांनी काढला, त्यांचा उद्देश वेगळा होता. त्यापूर्वी समुद्रस्नानाला युरोपांत नखशिखांत पोषाख करावा लागत असे आणि पाण्यांतून बाहेर पडल्याबरोबर एक मोठा झगा गुंडाळून घेऊन ताबडतोब कपडे बदलण्याच्या खोलींत जावें लागत असे. त्या मानाने हल्लीचा पोषाख म्हणजे मोठीच सुधारणा होती. हल्लीचा पोषाख अंगाला घट्ट बसतो, त्यांतून शरीराचा आकार स्पष्ट दिसतो आणि तो पुष्कळ वेळां अतिशय भडक रंगाचा असतो. त्याच पोषाखांत वाळूंत खेळ खेळलेले चालतात तेव्हां आता शरीर दिसूं नये हा उद्देश नाहीसा झाला. उलट भडक रंगामुळे तिकडे लक्ष जातें. पूर्वीचा विनय जर आता राहिला नाही, ( हिंदुस्थानांत सार्वजनिक स्नानाचे प्रसंगीं विनयाचा प्रश्नच नसतो आणि वस्त्रें बदलतांना शरीराचे सर्व भाग दिसूं शकतात ) तरमग हा अंगाला चिकटणारा पोषाख घालणें ही आरोग्यदृष्ट्या मोठी चूक आहे. कपडा कितीही पातळ असला तरी त्याने हवेला व उजेडाला त्वचेपर्यंत पोंचण्यास अडथळा होतो. याची प्रतीति पाहिजे असेल तर अशा लोकांचें शरीर तपासल्यास त्यावर नेहमी झांकलेल्या भागांची मर्यादा स्पष्ट दिसते. झांकलेले भाग जास्त उजळ दिसतात. परंतु उजेडाचा परिणाम केवळ त्वचेवरच होत नाही. तो अंतःस्रावग्रंथींवर बऱ्याच प्रमाणांत होतो हें अलीकडे सिद्ध झालें आहे. हा इष्ट परिणाम पूर्णपणें होण्यास उजेड उघड्या त्वचेवरच पडला पाहिजे. शरीराच्या मध्यभागांत महत्त्वाचीं इंद्रियें असतात, तेव्हां तो झांकण्यापेक्षा हातपाय झांकल्याने कमी नुकसान होईल. याचा अर्थ असा नव्हे की चड्डी घालावी लागल्यास उजेडांत जाऊंच नये. पूर्ण नग्न होतां न आल्यास अर्धनग्नतेचा फायदा जरूर घ्यावा. परंतु तत्वतः पूर्णनग्नतेची जरूर आहे हें कबूल केलें पाहिजे. युरोपांत स्त्रियांनी समुद्रकिनाऱ्यावर व स्नानाचे वेळीं स्तन झांकण्याकरता एक कांचोळीवजा वस्त्र आणि चड्डीसारखें आणखी एक वस्त्र वापरण्याची पद्धत पडली आहे. हें अत्यंत घातक आहे. स्तनांचें पतन होण्याचें एक कारण त्यांना हवा न मिळणें हें होय. शिवाय अशा वस्त्राने श्वासोच्छ्वासास

अडथळा होतो, खांद्यांच्या गतीस अडथळा होतो. आणि सौंदर्याच्या दृष्टीने ते अत्यंत गचाळ दिसतें. असेच आक्षेप पुरुषांच्या लंगोटवजा चड्डीस लागू आहेत. त्यापेक्षा रुंद मोठी चड्डी बरी, कारण त्याने अडचण कमी होते. ज्यांना नग्न होऊन व्यायाम करण्याची संवय आहे त्यांना ही अडचण समजते. शिवाय अंगाबरोबर बसणारा पोषाख थंडीला निरुपयोगी असतो आणि उन्हाळ्यांत त्याने त्रासच होतो, कारण घाम वाळण्यास त्याने अडथळा होतो. त्यांतल्या त्यांत हें वस्त्र एकदा भिजलें म्हणजे तें अंगावर राहूं देण्यांत धोका असतो. तें वापरायचेंच असेल तर पाण्याबाहेर आल्याबरोबर तें बदललें पाहिजे.

लोकांचा विनय किंवा नीतिमत्ता वस्त्राच्या लांबीरुंदीवर मोजणें शक्य नाही. कित्येक ठिकाणीं पुरुषांच्या लंगोटवजा चड्डीची रुंदी कमरेशीं १३ सेंटिमीटर ( अजमासें ५ इंच ) पेक्षा कमी असतां नये असा नियम पोलिसाने केलेला आहे. स्त्रियांच्या पोषाखाचे बाबतींत तर कित्येक वेळां जो पोषाख किंवा त्याचा जितका अभाव रंगभूमीवर चालतो, तितका देखील स्नानाकरता किंवा व्यायामाकरता चालं नये हें आश्चर्य आहे. अंगाला चिकटून बसणारा कपडा वापरल्याने विनयाचें रक्षण कसें होतें हें समजणें कठिण आहे, कारण झांकलेल्या सर्व भागांची रूपरेषा त्यांतून स्पष्ट दिसते आणि त्यांकडे लक्ष जास्त जातें. हे भाग अश्लील असले तर ते नीट झांकण्यासारखें वस्त्र वापरलें पाहिजे, नपेक्षा ते उघडे ठेवण्यास काय हरकत आहे? मोकळ्या हवेंत जाण्याचें ढोंग करून शरीराला हवा मात्र लागूं द्यायची नाही, यांत काय साधतें हें समजत नाही.

कांही लोकांची अशी कल्पना असते की नग्नतेचा पुरस्कार करणारे लोक एरवीही चमत्कारिक पोषाख करीत असतील. हें खोटें आहे. अर्थात् पोषाखांत साधेपणा आणण्याचे प्रयत्न स्तुत्यच समजले पाहिजेत. कडक गळेपट्या, गळेबंद वगैरे निरुपयोगी आणि मोकळ्या हालचालीस प्रतिबंधक कपडे टाकून देणें योग्य. पण साधा पोशाख म्हणजे गबाळपणा मात्र नव्हे. खमिसाचा गळा उघडा असला तरीही तो व्यवस्थित व स्वच्छ पाहिजे. अर्थात् कांही मोठ्या समारंभांचे प्रसंगी विशिष्ट पोषाख घालण्यांत कांही गैर नाही. विशिष्ट अधिकार दाखवण्याकरता

## वस्त्रासंबंधीं चुकीच्या कल्पना

वेगळा पोशाख , असण्यास हरकत नाही. अलंकारांची आवड बऱ्याच स्त्रियांना आणि पुरुषांनाही असते आणि तसें पाहिलें तर कपडा देखील प्रथम अलंकारच होता. ही आवड नैसर्गिक आहे आणि त्यांत कांही वावगें दिसत नाही.

स्वतःचें आरोग्य राखणें हा नीतीचाच एक भाग आहे आणि आरोग्या-करता सर्व शरीराला हवेची जरूर असते; तरमग नग्नतेला नीतीची हरकत कशी असेल ? नग्न होणें लोकांना गैर वाटतें, परंतु हा केवळ परंपरेचा परिणाम आहे. जेव्हा आधुनिक डाक्तरांनी उघड्या अंगावर पिचकारीने पाणी उडवण्याचा फायदा लोकांना प्रथम सांगितला, तेव्हा लोक डाक्तरांसमोर नग्न होण्यास तयार नसत आणि रोग्याला पाहिल्याशिवाय त्याचे अंगावर पाणी उडव-ण्याची व्यवस्था करावी लागत असे. आता असा कोणी रोगी भेटला तर त्याला लोक हंसतील. तशीच जरूरीपुरती नग्नताही प्रचारांत येईल. येईल, पण त्याला वेळ लागेल. या बाबतींत धार्मिक आक्षेप फोल आहेत. आम्हाला प्रत्यक्ष प्रयोगांचा आधार आहे. हवेचा आणि उजेडाचा परिणाम होण्यास शक्य तितका जास्त वेळ नग्न राहिलें पाहिजे आणि या दृष्टीने आम्ही वागतों. हा केवळ संवयीचा प्रश्न आहे. गेल्या लढाईत फ्रान्समध्ये आलेले अमेरिकन सैनिक पूर्ण नग्न होऊन नदींत स्नान करून नंतर तसेच शेजारच्या रानांत खुशाल खेळत असत आणि खेडीं, रस्ते वगैरे जवळ असल्यामुळे ते लोकांच्या नजरेस पडत असत. याविरुद्ध कोणीही तक्रार केली नाही, कारण आमच्या मदतीला आलेल्या अमेरिकन् लष्कराविरुद्ध बोलण्याची कोणाचीही छाती नव्हती, आणि नंतर त्याची संवय झाल्यामुळे त्याचें कांहीं वाटत नाहींसें झालें. यांत नीतिअनीतिचा कोणताही संबंध नव्हता. ज्यांनी नग्नसंघ पाहिले आहेत त्यांचाही अनुभव असाच आहे की प्रथम काय चमत्कारिक वाटेल तेवढेंच, पण नंतर नग्न शरीर पहाण्याची संवय ताबडतोब होते, आणि नंतर त्याकडे लक्षच जात नाही. आपण कांहीं वाईट गोष्ट करीत आहों असें तेथील लोकांना मुळीच वाटत नाही. तें त्यांना अगदी नैसर्गिक वाटतें आणि नवीन लोकांचीही लवकरच खात्री होते की यांत कांही अश्लील नाही.

# रशियांतील स्त्रियांची सद्यःस्थिति

( फ्रेंचवरून )

रशियांतील राज्यक्रांतीबरोबर स्त्रियांना प्रथम बरेंच स्वातंत्र्य मिळालें हें निर्विवाद आहे, परंतु आता तें हळूहळू कमी होत आहे, आणि याचें कारण एकच की बहुतेक सर्व सत्ता पुरुषांच्या हातांत आहे. युद्धाची दृष्टि उत्पन्न झाल्यामुळे त्यांत मरायला लोक पाहिजेत आणि स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्यास मरायला पुरेसे लोक उत्पन्न होत नाहीत. तेव्हा जनावरांना जशी विपुल संतति होते त्याचप्रमाणे स्त्रियांनाही व्हावी अशा दृष्टीने इलाज आज सुरू झाले आहेत. म्हणजे आता इतर देशांत आणि रशियांत या बाबतींत फारसा फरक राहिलेला नाही. जनावरांची पैदास करतांना ज्या दोन जनावरांपासून संतति व्हावी अशी इच्छा असेल त्यांना एकत्र ठेवून तेथे दुसरीं जनावरें फिरकूं न दिल्याने काम होतें. माणसांचे बाबतींत तसें करतां येत नाही, यामुळे पाहिजे असेल तशी संतति होणें कठिण आहे. तथापि विपुल संतति होण्याकरितां संततिनियमनांत अडथळे आणावे व गर्भपात बंद करावा, हे दोन उपाय आहेत. रशिया या दिशेने वहात आहे. इतर देशांपेक्षा तेथे आज स्त्रियांना राजकीय व आर्थिक हक्क जास्त आहेत, पुरुषांच्या इतके आहेत, हें खरें. तथापि मुख्य अधिकराच्या जागा पुरुषांनीच व्यापलेल्या आहेत. कामविषयक स्वातंत्र्य स्त्रियांना प्रथम होतें तें आज नाही. कारण स्त्रियांचे बाबतींत कामविषयक स्वातंत्र्याचा अर्थच हा की कोणत्याही पुरुषाशी समागमाची पूर्ण मोकळीक, अर्थात् दोघांचे संमतीने, असली पाहिजे, संततिनियमनाची किंवा तें फसल्यास गर्भपाताची व्यवस्था पाहिजे आणि मूल कोणापासून झालें याची कोणी चौकशी करतां नये.

गर्भपातासंबंधी रशियांतील नवीन कायदा इतर देशांपेक्षा फारसा वेगळा नाही. स्त्रीचा जीव वांचवण्याकरता गर्भपात सर्वत्र, निदान सुधारलेल्या देशांत,

चालतो. रशियांत आणखी एक कारण चालतें, तें म्हणजे आईबापांना एखादा आनुवंशिक रोग असल्यासही गर्भपात करतां येतो. म्हणजे आता रशियांत मातृत्व स्त्रीचे इच्छेवर नाही. तेथे संततिनियमनाचीं साधनें विकण्यास पूर्ण मोकळीक आहे की नाही हें माहीत नाही. ती नसल्यास इतर देशांपेक्षाही वाईट स्थिति आहे. स्त्रीला मूल झाल्यास त्याच्या ( खऱ्या किंवा कोर्टाने ठरवलेल्या ) बापाला त्याच्या खर्चाकरता पैसे द्यावे लागतात हें ठीक आहे, परंतु याने स्त्रियांना स्वातंत्र्य मिळतें असें मात्र नाही. जनावरांप्रमाणे जिला यदृच्छेने पोरें होतात ती स्त्री स्वतंत्र खास नाही, मग मुलांची व्यवस्था कितीहि चांगली असो. रशियांत अविवाहित स्त्रियांना मुलें होण्यांत कमीपणा नाही, विवाहित जोडप्यांत व अविवाहित जोडप्यांत कायद्याने फरक मानलेला नाही, व्यभिचारालाही परवानगी आहे, हें सर्व ठीक आहे. पण गर्भपाताची बंदी केल्यामुळे हे सर्व फायदे नष्टप्राय झालेले आहेत.

टॉलस्टॉयने एके ठिकाणीं लिहिलें आहे की कालांतराने इतर सर्व राष्ट्रें नष्ट होऊन सर्व जगांत एक तृतीयांशावर इंग्रजांची सत्ता राहील, एक तृतीयांशावर जपानची व राहिलेला तृतीयांश रशियाच्या ताब्यांत राहील. या दृष्टीने लोकसंख्या वाढवण्याचा रशियाचा प्रयत्न दिसतो.

रशियासंबंधी दोन प्रवाशांनी आणखी एक गोष्ट नमूद केली आहे ती ही की वेश्यावृत्ति बंद करण्याकरिता रशियाने कितीही प्रयत्न केला असला तरी प्रवाशांना पुरेशा वेश्या मिळतात आणि इकडे अधिकारीवर्ग काणाडोळा करतो. तसें न केल्यास मोठमोठीं हाटेलें बंद करण्याची वेळ येईल आणि प्रवासी न आल्यामुळे देशाचें नुकसान होईल. तेव्हा प्रवाशांची सोय केलीच पाहिजे ! पैशासारखें दुसरें तत्व जगांत नाही. या वेश्या केवळ प्रवाश्यांकरिता राखून ठेवलेल्या नसून इतरांनाही मिळतात असेंही एकाने लिहिलें आहे.

---

# पोंच व अभिप्राय

१. **चढाओढ,** लेखिका, सौ. शकुंतला परांजपे-स्लेप्ट्सॉफ् (डॉ. र. पु. परांजपे यांचा बंगला, फर्ग्युसन् कॉलेज रोड्, पुणें नं. ४) चार अंकी प्रहसन. पृष्ठसंख्या ६४. किंमत सहा आणे.

२. **सोयरीक,** लेखिका, सौ. शकुंतला परांजपे-स्लेप्ट्सॉफ्, दोन अंकी प्रहसन. पृष्ठसंख्या ६०. किंमत सहा आणे.

हीं दोन्ही प्रहसनें प्रसिद्ध फ्रेंच प्रहसनांचीं रूपांतरें आहेत. दोन्ही मनोरंजक आहेत आणि रूपांतरांची भाषा साधी, सर्वांस समजण्याजोगी असल्यामुळे त्यांचा प्रयोग झाल्यास हास्यरस विपुल उत्पन्न होईल यांत शंका नाही. पहिल्या प्रहसनांत एकाच मुलीशीं विवाहेच्छु दोन तरुणांची चढाओढ दाखवली आहे आणि त्यांत मनुष्यस्वभावाचें सूक्ष्मज्ञान दिसून येतें व कथानकही बरेंच गुंतागुंतीचें आहे. दुसरें प्रहसन अधिक साधें आहे आणि सोयरीक जमवतेवेळीं दोन्ही पक्षांचे श्रीमंतीचा आभास उत्पन्न करण्याचे हास्यास्पद प्रयत्न त्यांत दाखवले आहेत. पहिल्या प्रहसनाचे आरंभी श्री. न. चिं. केळकर यांचा दोन्ही प्रहसनांवरील अभिप्राय जोडला आहे. त्यांत त्यांनीं दुसरें प्रहसन लहानसें आणि पहिलें मोठें ठरवलें आहे. पृष्ठसंख्येवरून पाहतां इतका सूक्ष्म फरक ओळखल्याबद्दल साहित्यसम्राटांची तारीफ करणें जरूर आहे. हा फरक आमच्यासारख्यांच्या लक्षांतही आला नसता. दुसऱ्या प्रहसनाला प्रो. वा. म. जोशी यांची प्रस्तावना जोडली आहे. त्यांना 'सांगू का मी तुला?' हें वाक्य भाषांतरित दिसतें. आम्हास तें तसें दिसत नाही. कदाचित् 'खरं सांगू?' हें त्या जागीं अधिक चांगलें दिसलें असतें इतकेंच. 'मी माझं लुगडं सोडलं नव्हतं' (सोयरीक, पान २८ ओळी १-२) हें मात्र मराठी नाहीं. 'मी आपलं लुगडं' असें पाहिजे. 'सोयरीक,' पान १०-११ येथें मालती आंत जाऊन सातआठ ओळींत पुनः पातळ बदलून बाहेर

शतें. एकावर एक दोन पातळें नेसल्याशिवाय हें रंगभूमीवर सांधणार नाहीं आणि तसें केल्यासही तें चमत्कारिक दिसेल, तसेंच ' चढाओढ, ' पान २८ येथें पिंगळे नांवाचें वसंतरावांचे लांबचे नातेवाईक वाई येथे असतात आणि ते सरस्वतीबाईचे सावत्र मामेभाऊ निघतात. यानंतर दोनचार वाक्यांनीं वसंतराव म्हणतात, ' आंधळे आहेत वाटेंत आमचे मेव्हणे ? हे गृहस्थ एकदम मेव्हणे कसे झाले ? भावी इच्छित पत्नीच्या भावाला कदाचित् मेव्हणा म्हणतां येईल, पण सरस्वतीबाई ही भावी पत्नी नव्हे, सासू आहे. अशा कांहीं किरकोळ चुका सोडल्यास दोन्ही प्रहसनें रंगभूमीवर यशस्वी व्हावीं असें वाटतें.

**३. हस्त-छाया चित्रें.** लेखक, डॉ. के. भा. लेले, ८४७, सदाशिव पेठ, पुणें– २. किं. ट. ख. सह ७ आणे. व्हीपी नाहीं,

केवळ हातांच्या छाया भिंतीवर पाडून मनोरंजक चित्रें कशी दाखवतां येतात हें यांत आकृतींसह सांगितलें आहे. अर्थात् भिंतीऐवजी स्वच्छ पांढरा पडदा असल्यास उत्तम. दिवाही ' बारीक व तेजस्वी असावा ' पण प्रसंगीं मेणबत्तीवरही भागतें. याने करमणूक होते इतकेंच नव्हे तर मुलांचीं बोटें कुशल होऊन निरीक्षणशक्ति वाढेल.

---

# पत्रव्यवहार

आजपर्यंत माझ्या मनाला एक प्रकारची सारखी उत्सुकता लागून राहिलेली आहे. आयुष्यांत कांहीतरी, कोठेतरी व कसेंतरी चुकल्यासारखें वाटत असतें. माझा विवाह झालेला असून मला दोन मुलेंही आहेत. माझें वय सध्या ३० वर्षांचें आहे. माझी पत्नी सुशील आहे, पण कांही झालें तरी माझ्या मनाला एकसारखी कोठेतरी ओढ लागलेली असते व मोकळ्या मनाने व अगदी निःसंकोचपणे आपणाशी बोलेल, चालेल, गप्पागोष्टी करील व मैत्री ठेवील, अशा

कोणातरी सुशिक्षित स्त्रीचा परिचय व्हावा व स्नेह जडावा असें मनापासून वाटत असतें. मी अत्यंत सूक्ष्म विचार करून पाहिला व यांत आपणाला तिच्याशीं वैषयिक संबंध ठेवण्याची इच्छा आहे असें तूर्त तरी वाटत नाही. 'तूर्त तरी' म्हणायचें कारण एवढेंच की 'बलवान् इंद्रियग्रामः विद्वांसमपि कर्षति' असें आपले सुभाषितकार ओरडत असतात हेंच होय. असो, आपण या बाबतींत बराच विचार केलेला असावा असें वाटतें. म्हणून मी निःसंकोचपणें हें आपणास लिहिण्याची परवानगी घेतों. आपण समाजस्वास्थ्याचे संपादक या नात्याने या बाबतींत कांहीं मदत करूं शकाल का ! या दृष्टीने विचार करतां करतां मी परवा एकदा आपल्या समाजस्वास्थ्याचा एक जुना अंक चाळीत असतां (नोव्हेंबर १९३४ च्या अंकांत) खालील जाहिरात आढळली. '**मैत्रीण पाहिजे.** २५ वर्षांच्या तरुणास मनमोकळेपणाने स्वानुभवाने माहिती सांगणाऱ्या कोणत्याहि जातीच्या स्त्रीची ओळख पाहिजे' व म्हणूनच मी आज हें पत्र आपणांस मुद्दाम लिहीत आहे. या जाहिरातीचा उपयोग झाला किंवा कसें ? ही गोष्ट आपणास ठाऊक असेलच. तरी आपण या माझ्या मनःस्थितींत मला कांहीं मार्ग सुचवूं शकाल का ? व अशीच जाहिरात आपल्या अंकांत दिल्यास तिचा उपयोग होईल का ? या गोष्टीचा खुलासा करावा. अशी विनंति आहे, आपणाकडून पत्र येतांच आपला तसा सल्ला पडला तर वरील प्रमाणे जाहिरात द्यावी. मी त्याचा योग्य तो खर्च आगाऊ पाठवून देईन. पण माझ्या मनाचें समाधान या गोष्टीशिवाय होणार नाही, असेंच आतां बऱ्याच विचारांतीं माझें मत झालें आहे. या बाबतींत माझें व माझ्या पत्नीचेंही पुष्कळ बोलणें होतें. ही गोष्ट मी तिच्यापासून चोरून ठेवूं इच्छित नाही. इतकेंच काय पण हें पत्रही तिला दाखवूनच मी टाकीत आहें. या प्रकारच्या जाहिरातीचा कितपतसा उपयोग होऊं शकेल याची मला नीटशी कल्पना नाही. पण आपणाला मागचा एक दाखलाच असल्याने आपण या बाबतींत मला सल्ला देऊं शकाल असें वाटतें. पुन्हा दुसरी गोष्ट अशी की या बाबतींत दिवसानुदिवस स्त्रीपुरुष अधिकाधिक विचार करूं लागले असून आपल्या वाचकवर्गांत तरुण स्त्रियांची संख्या क्रमाक्रमानें वाढत असावी असें वाटतें. म्हणून १९३४ सालीं जी गोष्ट शक्य झाली

नाही ती आज होणें स्वाभाविक आहे. तरी अशा स्वरूपाची जाहिरात फलद्रूप होईल असें वाटतें व आपल्या वाचकवर्गात तरुण स्त्रिया असतील तर ही गोष्ट सहजच जमेल. म्हणून या गोष्टीचें खुलासेवार उत्तर यावें. आपला...

उ. ज्या स्त्रीला उपजीविकेकरता दुसऱ्याचे तोंडाकडे पहावें लागतें तिच्यावर त्या दुसऱ्याची—मग तो बाप, भाऊ, नवरा, कोणीही असो—मालकी असते, आणि तिला वाटेल त्या पुरुषाशीं अशा मोकळेपणाने वागावयाची परवानगी मालकाकडून मिळणें शक्य नसतें. त्यांत वैषयिक दृष्टि असो वा नसो, ती आहे असेंच लोक म्हणणार. तेव्हा असें स्वातंत्र्य एखाद्या स्त्रीला घ्यायचें असल्यास तिच्याजळ स्वतःच्या मालकीचा मुबलक पैसा पाहिजे किंवा एखादा स्वतंत्र धंदा पाहिजे. नोकरी उपयोगी नाही, कारण असें स्वातंत्र्य घेतल्यास ती जाण्याचा संभव असतो. अशा स्वतंत्र स्त्रिया पाहिजे तसें वागूं शकतात आणि वागतातही, परंतु अशी स्त्री जाहिरातीने मिळणें कठिण. आपल्या लहानशा शहरांत अशा स्त्रिया फारशा असणें शक्य नाही. गणिकांचा वर्ग स्वतंत्र असतो, पण त्यांची प्रवृत्ति पैसा उकळण्याकडे, मैत्री करण्याकडे नव्हे. अशा स्त्रीची यदृच्छेने ओळख झाल्यास आपला हेतु साधणें शक्य आहे, परंतु पूर्वीची ओळख असल्याशिवाय अशी स्त्री केवळ जाहिरातीवरून आपल्या गांवीं कशाला येऊन राहील? अर्थात् रखेली ठेवूनही हा हेतु साधणें शक्य आहे, परंतु तिच्या उपजीविकेची जबाबदारी आपणास घ्यावी लागेल, आणि अशा स्थितींत स्त्रीला तितका मोकळेपणा रहात नाही. ज्या स्त्रीवर बंधन आलें तिची स्थिति थोडीबहुत पत्नीसारखीच होणार. या मासिकामार्फत वाटल्यास कोणासही पत्रव्यवहार करतां यावा अशी एक योजना लवकरच करण्याचा आमचा विचार आहे. यासंबंधी कोणास कांहीं सूचना करणें असल्यास कराव्या. सं.

---

# शारदेचें पत्र

हिंदुस्थानांत स्त्रियांचा दर्जा कदाचित् निर्जीव वस्तूंपेक्षा थोडासा अधिक,

पण पाळींव जनावरांपेक्षा किंवा अजाण मुलांपेक्षा अधिक नाही, हें जाज्वल्य सनातन्यांना तर पसंतच आहे, पण सुधारक म्हणवणारे प्रच्छन्न सनातनी देखील पर्यायाने हेंच म्हणत असतात. 'सरस्वती' मासिकांत श्री. संतराम, बी. ए. नांवाच्या एका लेखकाने 'हिंदू स्त्रियों के अपहरण के मूल कारण' या मथळ्याखाली एक लेख लिहिला आहे. हे गृहस्थ स्वतःला कोणत्या वर्गांत घालतात समजत नाही. परंतु ते ठिकठिकाणीं मनूचा आधार देतात. त्यांचें म्हणणें की स्त्रियांना लज्जा व संयम पुरुषांपेक्षा अधिक असतात आणि यामुळे एखाद्या स्त्रीला प्रेमपाशांत अडकवणें पुरुषांना कठिण जातें, पण एकदा का त्या फसल्या, की त्या जन्माच्या अडकतात आणि याचा फायदा घेऊन मुसलमान लोक हिंदू स्त्रियांना फूस लावतांत आणि फसवतात व त्या पुनः परत येऊं शकत नाहींत इतकेंच नव्हे तर त्यांना येण्याची इच्छाच होत नाही. याचें कारण ते एक म्हण सांगतात की 'स्त्री, घोडा आणि तलवार, हीं ज्याच्या ताब्यांत सांपडतील त्याचींच होतात.' यांना म्हणी बऱ्याच येतात असें दिसतें. ते एक गुजराथी म्हण देतात, 'ब्राह्मणी रांडे, तुर्क नो घर मांडे' म्हणजे ब्राह्मणी विधवा झाली तर तिला पुनर्विवाह करण्यानेही कमीपणा येत असल्यामुळे ती सरळ मुसलमानाकडे जाते. लहानपणीं बापाच्या, तारुण्यांत पतीच्या आणि वार्धक्यांत पुत्राच्या ताब्यांत स्त्रीने राहिलें पाहिजे ही मनूची शिकवण हे गृहस्थ शिरोधार्य मानतात. ते मनूचे आणखीही श्लोक देतातः—'नैता रूपं परीक्षंते नासां वयसि संस्थितिः । सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुंजते ।। पौंश्चल्याच्चलचित्ताच्च नैस्नेह्याच्च स्वभावतः । रक्षिता यत्नतोऽपीह भर्तृष्वेता विकुर्वते ।। एवं स्वभावं ज्ञात्वासां प्रजापतिनिसर्गजं । परमं यत्नमातिष्ठेत् पुरुषो रक्षणं प्रति ।। यावरून ते असा निष्कर्ष काढतात की स्त्रियांना समान हक्क वगैरेसंबंधी बडबड इंग्लंडांत ठीक असेल, पण ती भारतवासीयांच्या उपयोगी नाहीं. अळतेकरांच्याप्रमाणेच हेही म्हणतात की कांही झालें तरी त्याला मर्यादा हवी; सुधारणा अवश्य पाहिजे, पण ती मला वाटतें त्या मर्यादेपर्यंतच योग्य, त्यापुढे एक पाऊल जातां नये. म्हणे पंजाबांतल्या एका आय्. सी. एस्. ची बायको एका मुसलमान पुढाऱ्याबरोबर

पळून गेली. तिलाही मुसलमानांसारखी पडद्यांत ठेवली असती तर ती कशाला जाती ? आणि तरी स्त्रियांना स्वातंत्र्य द्यावें म्हणतात. आश्चर्य आहे ! तसें म्हटलें तर हे गृहस्थ कट्टर सनातनीही नाहींत, कारण हा प्रकार बंद करण्याकरता विधवा-विवाह, आंतरजातीय विवाह, वगैरे सुरू करावे असें त्यांचें म्हणणें आहे. एकंदरींत हा अळतेकरांचा दुसरा प्रकार आहे झालें.

पुरुषांनी अशा रीतीने बायकांची नालस्ती केली तर मोठेंसें नवल नाही, कारण बायकांना बिनपगारी नोकरांप्रमाणे घरांत राबवण्याकरता असल्या तत्व-ज्ञानाचा बराच उपयोग असतो. पण सुशिक्षित म्हणवणाऱ्या पदवीधर स्त्रियाही अशाच जातीचे लेख लिहूं लागल्या म्हणजे हंसावें की रडावें समजत नाही. मनोरमा गुप्त, एम्. ए. नांवाच्या हिंदी लेखिकेने 'विश्वमित्र' मासिकांत स्त्रियांच्या स्वातंत्र्याचीच घोषणा केली आहे, पण युक्तिवाद करतांना त्यांना विशेष पोंच राहिला नाही. शिवाय हेंही खरेंच की स्त्रियांच्या जीविताचें इतिकर्तव्य म्हणजे शरीरांतल्या कांही चौरस इंच जागेचा बचाव करणें, भटांची परवानगी असली तर स्वतःची मालकी सोडून ती एकाच पुरुषाच्या ताब्यांत देणें, आणि निदान तो मरेपर्यंत, किंवा सनातनी दृष्टीने तो मेल्यावरही, त्याची अविच्छिन्न मालकी चालूं देणें, ही कल्पना जोंपर्यंत सुशिक्षित स्त्रियांनाही सोडवत नाही तोपर्यंत त्या सुशिक्षित असल्या तरी काय करणार ? वरील लेखिका म्हणते, ' स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्यास त्यांचें चारित्र्य बिघडेल ही काय ती पुरुषांना मोठी भीति असते. पण याचा अर्थ असा होतो की पुरुषांचा पुरुषांवरच विश्वास नाही, कारण स्त्रियांना भ्रष्ट करणारे पुरुषच असतात. ' आपण युक्तिवादांत मोठी करामत केली अशा ऐटीने हें लिहिलेलें आहे. पण यांत स्त्रियांनाच कमीपणा येतो याचा तिला गंधही नाही. देव्हाऱ्यां-तला देव जसा महाराने स्पर्श केला म्हणजे भ्रष्ट होतो, त्याला बिचाऱ्याला कांही करतां येत नाही, तसेंच पुरुषांच्या मनांत आलें की स्त्रिया भ्रष्ट होतात, त्यांना कांहीच प्रतीकार करतां येत नाही, असा याचा सरळ अर्थ होतो. अशा लेखि-कांची मला खरोखर दया येते, पण त्या तरी काय करणार ? परंपरेंतून त्याही सुटल्या नाहीत. तिने रजपूत स्त्रियांच्या शौर्याचेंही वर्णन केलें आहे. शत्रूच्या

ढातांत सांपडण्याच्या भीतीने ज्या युद्धाच्या प्रारंभींच जीव देत असत, त्यांचें शौर्य काय वर्णायचें आहे ? हा मूर्खपणा आहे हेंही अजून बऱ्याच लोकांना समजलेलें नाहीं.

पुरुषांना स्त्रियांची नालस्ती करावी, त्यांच्या स्वातंत्र्याच्या आड यावें, त्यांना मातृपदाची आणि पावित्र्याची ( म्हणजे कांहीं चौरस इंच जागा रक्षण करण्याची ) महति सांगण्याचें ढोंग करावें, हें तर सरळच आहे. गुलामांचे मालक गुलामगिरीविरुद्ध कसे असणार ? तेव्हा नागपूरच्या सेवासदनच्या गणेशोत्सवांत ' निःस्पृह ' कर्ते श्री. मा. ज. कानेटकर यांनी ही विचारसरणी पुढें मांडली हें ठीकच आहे. पण ती कबूल करण्याइतक्या बावळट स्त्रिया अजून सांपडतात हें हिंदुस्थानचें दुर्दैव आहे. स्त्रियांच्या पावित्र्याचें महत्व सांगितल्यावर आपला निःपक्षपातीपणा दाखवण्याकरता अर्थातच ते नेहमीच्या पद्धतीने म्हणाले की पावित्र्याबद्दल माझा स्वतःचा पुरुषवर्गावरही तेवढाच कटाक्ष आहे. हें म्हणणें अगदी सोपें आहे, त्याप्रमाणें कोणीही वागण्याची फारशी भीति नाही. ते म्हणतात पुरुष वाममार्गानें जातात ( वाममार्ग म्हणजे कानेटकरांना पसंत नसलेला मार्ग )म्हणून स्त्रियांनीही समान हक्क गाजवण्याकरता म्हणून तसेंच वागतां कामा नये. अगदी बरोबर. या वाक्याला मी १०० मार्क देईन. माझें इतकेंच म्हणणें आहे कीं आमच्या स्वतःच्या शरीरावर आमचा हक्क आहे आणि पुरुषांनी कांहीं केलें तरी स्त्रियांनी हा हक्क सोडतां नये. पुरुषांचें अनुकरण करण्याकरता नव्हे, तर आपला जन्मसिद्ध कायम हक्क ठेवण्याकरता आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे. पुरुषांनीं कदाचित् आपला हा हक्क एखादेवेळीं मूर्खपणानें सोडला ( ते सोडतील असें मुळीच दिसत नाहीं ), तरी देखील आम्ही सोडायला तयार नाहीं. आमचे हक्क आम्हाला पाहिजेत म्हणून आम्ही भांडतों. आमच्या शरीरावर दुसऱ्याचा ताबा चालावा ही गुलामगिरी आहे आणि तीविरुद्ध आम्ही बंड करणार. मग तुम्ही तिला पावित्र्य म्हणा नाहीतर आणखी कांहीं म्हणा.

माई वरेरकरांना हल्ली काय झालें आहे कांही समजत नाही. त्यांना पुरुषांचा संपर्क नको म्हणून त्यांनी वेगळें मासिक काढलें आणि त्यांत पुरुषांचे

लेख घ्यायचे नाहीत असा त्यांचा नियम आहे. आता त्यांना मासिक चालवायला पुरुषांचीच मदत घ्यावी लागली, आणि तें पुनः सुरू झालें आहे तेंही पुरुषांच्याच मदतीनें, तरी पण स्त्रियांचा सवता सुभा करण्याचीच त्यांची इच्छा होती. तरी देखील सर मनुभाई मेहता यांनी स्त्रियांसाठी वेगळ्या विद्यालयाची तरफदारी केलेली त्यांना खपत नाही. मासिक जर स्त्रियांकरता वेगळें पाहिजे तर विद्यालय कां नको ? तसेंच पुण्यास दोन पदवीधर स्त्रियांनी असाच वेडगळपणा करून 'महिलासेविकासमाज' काढला, तोही त्यांना पसंत नाही. भारतसेवक समाजाच्या लोकांनी त्यांना आपल्यांत घेतलें नाही. म्हणून त्यांना वेगळा समाज काढावा लागला अशी त्यांची तक्रार आहे स्त्रियांकरता वेगळें कांहीही काढण्याचा अधिकार फक्त आपल्यालाच आहे आणि इतर स्त्रियांना किंवा पुरुषांना नाही अशी माईंची कल्पना दिसते. लोक आपलें अनुकरण करतात म्हणून त्यांना बरें वाटावें की वाईट वाटावें ? त्यांना जसे पुरुष नकोत, तशाच भारतसेवक समाजाला स्त्रिया नकोत. मिश्र संस्थांत नीतिमत्ता बिघडण्याची भीती पुष्कळ लोकांना वाटत असते. त्यांनाही कदाचित् आपली नीतिमत्ता बिघडण्याइतकी डळमळीत वाटत असेल, आणि अर्थात् हें त्यांनाच जास्त माहीत असलें पाहिजे ! पण त्यांत माईंचें काय बिघडलें ! महिलाविद्यालय त्यांना न आवडण्याला कांही कारण झालें असेल, पण भारतसेवक समाजानें त्यांचें काय घोडें मारलें आहे ? गेल्या आजारांत त्यांच्या मेंदूला थोडा धक्का बसला असावासें वाटतें.


तुझी शारदा

---

# व्यायाम–३२

मागील अंकीं ७० नंबरचे व्यायामांत ५१ व ५२ या आंकड्यांऐवजी ५१ व ६२ वाचावे ( फेब्रुवारी व जून १९३६ ).

**७१.** जमिनीवर सरळ उपडे निजा व हात नाठ व मांडीला लागलेले असूं द्या. नंतर हात जमिनीपासून किंचित् उचलून आडवे वर्तुळाकार नेऊन



( आकृति ६२ )

डोक्याचे पुढे आणा व या अवधींत श्वास पुरा आंत घ्या. नंतर श्वास बाहेर सोडतांना हात परत वर्तुलाकार नेऊन मूळपदावर या. असें ४ वेळां करा. यांत हात नेहमी ताठ राहून जमिनीला लागल्याशिवाय हालले पाहिजेत ( आकृति ६२ ).

७२. खांद्यांवर हात ठेवून ताठ उभे रहा ( आकृति ३६ पहा ), नंतर



( आकृति ६३ )

( १ ) टांचा जमिनीपासून उचलून त्यांवर बसा व याच अवधींत हात वर नेऊन ताठ करा ( आकृति ६३ ) आणि श्वास पुरा आंत घ्या. ( २ ) श्वास बाहेर सोडीत पुनः मूळपदावर या. श्वास सावकाश घेतला व सोडला पाहिजे आणि पहिल्या व दुसऱ्या भागाला सारखाच वेळ लागला पाहिजे. असें सहा वेळां करा. ७३. सरळ ताठ उभे रहा. नंतर श्वास आंत घेतांना हात ताठ ठेवून पुढचे बाजूने वर नेऊन शक्य तितके मागे जाऊं द्या. नंतर श्वास बाहेर सोडतांना हात ताठ आणि शक्य तितके मागे ठेवून दोन्ही बाजूंनी खालीं आणा. असें चारपांच वेळां करा.

---

**गरोदरपणांत कोयनेल**—बाळंतपणापूर्वी दोन तीन आठवडे गरोदर स्त्रियांस दिवसांतून तीन वेळां तीनतीन ग्रेन् कोयनेल दिल्यास बाळंतपण अधिक सोपें होतें असें दिसतें. या प्रमाणांत कोयनेल शक्तिवर्धक असल्यामुळे त्यांची सहनशक्ति वाढते, बाळंतपण लवकर आटपतें आणि सोपें होतें आणि मागूनहि जास्त त्रास होत नाही. मूत्रांत आल्ब्युमेन् सांपडत असल्यास मात्र कोयनेल देऊं नये; एरवी देण्यास हरकत नाही. ( ब्रिटिश् मेडिकल् जर्नल )

**भुताटकीचे प्रयोग**—परलोकविद्येच्या नांवाखाली होत असलेल्या करमणुकीच्या प्रयोगांनी मानसिक व मज्जातंतूंचे रोगांस उत्तेजन मिळत असल्यामुळें अशा प्रयोगांस रूमॅनियामधे बंदी केली आहे ( प्रेस मेडिकॅल )